पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, फेब्रुवारी २०२१, खंड १९, अंक ११, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● धाक

५ ● 'ऑनलाइन' रागाचे करायचे तरी काय ?

११ ● चिनी आक्रमकतेमागील मानसिकता

१९ ● राज्य सरकारांचे वित्तीय वास्तव


भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १९ (अंक ११) फेब्रुवारी २०२१**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# धाक

संपूर्ण वर्ष धुमाकूळ घालणा-या 'कोविड-१९' या विषाणूच्या भयकारी सावटातून लौकरात लौकर बाहेर पडण्याच्या दृष्टीने नव्याने उगवलेले हे वर्ष उपकारक ठरो, अशी मनोमन प्रार्थना (आणि अपेक्षाही) आज उभा जागतिक समुदाय करतो आहे. हा सगळांच प्रकार कमालीचा गंमतशीर आणि चक्रावून टाकणारा असाच आहे. ज्या चीनमध्ये या विषाणूचा उद्‌भव झाल्याचे मानले जाते तो चीन आणि त्या देशाची अर्थव्यवस्था, 'जणू काही घडलेच नव्हते', अशा आविर्भावात आता वागते-विहरते आहे. उर्वरित जग मात्र त्याच्या पोळलेल्या गात्रांवर अजूनही फुंकर घालतच बसलेले दिसते. अर्थात, चीनकडून कधीच कोणी कोणत्याच पारदर्शकपणाची अपेक्षा करत नाही, हेही तितकेच खरे. संपूर्ण राष्ट्राला आपल्या पोलादी पकडीमध्ये जखडून ठेवणा-या कम्युनिस्ट पक्षाच्या एकाधिकारशाहीने चीनच्या अस्तित्वावर गुप्ततेचे एक तितकेच पोलादी आवरण घट्ट आच्छादलेले आहे. त्यांमुळे, चीनमध्ये नेमके काय चाललेले आहे, 'कोरोना'च्या संदर्भात तिथली परिस्थिती नेमकी आज कशी आहे, त्या अरिष्टाचा चिनी अर्थव्यवस्थेला बसलेला धक्का खरोखरच किती सघन आणि सखोल होता अथवा आहे, त्या धक्क्यातून बाहेर येण्यासाठी तिथल्या धोरणकर्त्यांनी नेमकी कोणती उपाययोजना केली, तिला सर्वसामान्य चिनी मनुष्याने कशा प्रकारचा प्रतिसाद दिला...यांसारख्या एका म्हणजे एकाही जिज्ञासेचे शमन घडून येणे त्या अपारदर्शक पोलादी पडद्यापायी दुस्तरच शाबीत होते. एवढे सगळे होऊनही, जागतिक पटलावर चीनची हुच्चगिरी जोरात चालूच आहे. शेजारील देशांबरोबरील कलागती, त्या देशांबरोबर असलेले सीमावाद खदखदत ठेवणे, आपल्या सागरी सीमांच्या हद्दी रेटत राहणे, सागरपोटातील बेटांवर बळजबरीने हक्क सांगत तिथे नाविक तळांची उभारणी करणे...अशासारखे सगळे उद्योग चीनने सुरळीत जारी राखलेले आहेत. 'कोविड-१९' सारख्या उत्पातक महामारीच्या माथ्यावर पाय देऊन आम्ही पुन्हा खंबीरपणे उभे आहोत, हा संदेश वैश्विक समुदायाच्या मनावर बिंबवण्याचा चिनी नेतृत्वाचा हेतू या सगळ्या आततायीपणामागे नक्कीच असू शकेल. परंतु, चीनची एकंदरच मानसिकता ध्यानात घेतली तर या हेतूच्या जोडीनेच, परिसरातील देशांना धाक उत्पन्न करण्याचाही अंत:स्थ हेतू या सगळ्या उपद्व्यापांच्या मुळाशी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात या अंकात मांडलेले काही विश्लेषण उपयुक्त व उद्‌बोधक ठरावे.



'कोविड-१९'च्या साथीने उडविलेल्या हाहाकाराचे देशोदेशींच्या अर्थव्यवस्थांना बसत असलेले चटके जीवघेणे आहेत यांत शंकाच नाही. त्यांतल्या त्यांतही पुन्हा, भारतासारख्या संघराज्यव्यवस्थेतील राज्यसरकारांची तर अवस्था अधिकच बिकट आणि नाजूक बनलेली आहे. भारतीय संघराज्यातील वित्तीय व्यवस्थेची पूर्वापार चौकटच अशी आहे की राज्यांच्या तुलनेत केंद्र सरकार महसुलाच्याबाबतीत अधिक बळकट अवस्थेत कायमच असते. साहजिकच, एखादे नैसर्गिक अथवा मानवनिर्मित अरिष्ट कोसळले की त्याचा मुकाबला करताना राज्य सरकारांच्या तिजो-या येतात पार मेटाकुटीला. गेले सुमारे वर्ष ते सवा वर्ष राज्ये सामना करत आहेत तो नेमक्या त्याच दुर्धर वास्तवाचा. राज्य सरकारांच्या सर्वसाधारण वित्तीय परिस्थितीसंदर्भात भारतीय रिझर्व्ह बँक अलीकडील काही वर्षांत नियमाने एक अहवाल प्रकाशित करत असते. सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठीच्या अशा अहवालातील या अंकात सादर केलेल्या काही बाबी वाचकांना रोचक वाटतील अशी अपेक्षा आहे. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## सामाजिक

# 'ऑनलाइन' रागाचे करायचे तरी काय?

'इंटरनेट' नामक नव्या तंत्राचा उदय झाला आणि आपले अवघे जगणेच बदलून गेले. माहितीच्या या महाजालामुळे पूर्वी अवघड वाटणा-या अनेक गोष्टी खूप सोप्या होत गेल्या. या माहितीचा विस्फोट होत गेला आणि उपयुक्त असणारी अथवा नसणारी सर्व प्रकारची माहिती आपल्यासमोर क्षणात येऊ लागली. या सगळ्यांत आणखी भर पडली ती समाजमाध्यमांचा उदय झाला तेव्हापासून. आजच्या घडीला समाजमाध्यमांचा प्रसार इतक्या वेगाने होतो आहे की अब्जावधी लोक या समाजमाध्यमांशी 'ऑनलाइन' धाग्याने आणि संवादाच्या पातळीवर जोडले गेलेले आहेत.

सध्याच्या काळामध्ये परस्परसंवादासाठी समाजमाध्यमे अधिक महत्त्वाची शाबीत होतात. कारण तिथे अंतराची मर्यादा संपुष्टात येते. त्यामुळे संवाद साधण्यासाठी, हवी ती माहिती क्षणात दुस-यापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि परस्परांच्या संपर्कात राहण्यासाठी समाजमाध्यमे हे एक प्रभावी साधन मानले जाते. मात्र, नाण्याला जशा दोन बाजू असतात त्या प्रमाणे समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरातून काही नवे धोके उजागर होत असल्याचे दिसून येत आहे. त्यातून अनेक मानसिक समस्याही वाढत असल्याचे अभ्यासकांच्या लक्षात आले आहे. या मानसिक समस्यांचा सामना कसा करायचा हे एक नवे आव्हान पुढ्यात उभे ठाकलेले आहे. समाजमाध्यमावरील संवादातून उद्‌भवणारे नवे धोके अधिक गंभीर असल्याचे अभ्यासकांच्या आताशा लक्षात येऊ लागले आहे.

समाजमाध्यमांवर दिसणा-या रागाचे स्वरूप आणि त्यातून निर्माण होणा-या नव्या समस्या हा अभ्यासकांसाठी चिंतेचा विषय बनतो आहे. तसे पाहिले तर, राग प्रत्येकाला येतो. रोजच्या व्यवहारामध्येसुद्धा रागावण्याचे प्रसंग अनेकदा येतात. परंतु, त्या रागावर प्रयत्नपूर्वक नियंत्रण मिळवता येते. समाजात असलो तर सामाजिक संकेतांमुळे आपण राग नियंत्रित करतो. परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही याची काळजी घेतो. स्वतःला सावरतो. मात्र, समाजमाध्यमांवर सध्या दिसणारे रागाचे स्वरूप चिंताजनक असल्याचे मत या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत.



समाजमाध्यमांवर रमणा-या व्यक्ती अनेकदा एखादी विशिष्ट भूमिका घेऊन वावरत असतात. त्यातूनच मग सामाजिक, राजकीय किंवा इतर कोणत्याही विषयावर वादविवाद सुरू होतात. तेवढे निमित्त रागाचा उद्रेक होण्यासाठी पुरेसे ठरते. स्पष्टवक्तेपणाची सीमारेषा ओलांडून कधी माणूस उद्धटपणाकडे कधी झुकतो हे कळतही नाही. स्पष्ट शब्दांत नेमकेपणाने आपले मत मांडणे आणि आपला मुद्दा ठसवण्यासाठी पलीकडच्या व्यक्तीचा 'ऑनलाइन' व्यासपीठावर जाहीर अवमान होईल अशा शब्दांत टीका करणे यातील सीमारेषा समाजमाध्यमांमध्ये व्यासपीठावर झपाट्याने पुसली जात असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

दिवसातून सहा तासांपेक्षा अधिक काळ ज्या व्यक्ती समाजमाध्यमांचा वापर करीत राहतात त्या कायम आतून अस्वस्थ असतात आणि त्यांच्यामध्ये वैचारिक स्थिरतेचा अभाव जाणवतो. समाजातील इतर व्यक्तींना कमी लेखण्याची प्रवृत्ती अशा व्यक्तींमध्ये दिसून येते, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. त्यामुळेच अगदी साध्या साध्या कारणांवरूनदेखील समाजमाध्यमांवर वाद पेटतात आणि विकोपाला जातात असे दिसून आले आहे. समाजमाध्यमांवर व्यक्त होताना अनेकदा पलीकडची व्यक्ती दिसत नसल्याने संवादाच्या किमान सामाजिक संकेतांचा भंग करत असभ्य भाषेतून मते दुराग्रहाने मांडली जातात. त्यामुळेच समाजमाध्यमांचा दीर्घकाळ वापर करणा-या व्यक्तींचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल अभ्यास होणे नितांत गरजेचे आहे, असे अभ्यासकांचे स्पष्ट मत दिसते.

समाजमाध्यमांवर व्यक्त होत असलेल्या रागाची कारणे जाणून घेण्याची, त्याचे मोजमाप करण्याची सुविधा तूर्तास तरी मानसशास्त्रज्ञांकडे उपलब्ध नाही. मात्र, अलीकडेच Gallup Global Emotions Report या आंतरराष्ट्रीय अहवालामध्ये या संदर्भातील काही बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. या अभ्यास अहवालामध्ये १४१ देशांतील समाजमाध्यमांचा वापर करणा-या सुमारे दीड लाख लोकांशी संवाद साधण्यात आला. त्या अभ्यासानुसार, मानसशास्त्रज्ञांनी असे अनुमान वर्तवले आहे की, समाजमाध्यमांचा वापर वाढतो आहे त्या प्रमाणात लोकांच्या रागाचे प्रमाणही वाढत चालले आहे आणि संयम, सहनशीलतेचे प्रमाण कमी होत चालले आहे. त्यामुळे समाजमाध्यमांद्वारे एखादा विषय समोर आल्यानंतर त्या संबंधात सारासार विचार करून प्रतिक्रिया दिली जात नाही. त्यामुळे समाजमाध्यमांवर व्यक्त होतानादेखील लोक अधिक गांभीर्याने कसे व्यक्त होतील, या दिशेने पावले टाकणे महत्त्वाचे आहे.

समाजात वावरताना, जाहीर व्यासपीठांवरून व्यक्त होताना व्यापक सामाजिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याचे पुरेसे भान सर्वसाधारणपणे राखले जात असल्याचे दिसून येते. परंतु, समाजमाध्यमांवर मात्र या बाबतीत एक प्रकारचा बेफिकीरपणा दिसून येतो. त्यामुळे जातीय-धार्मिक भावना दुखावणारे उल्लेख या व्यासपीठांवरून सातत्याने आणि सररासपणाने होताना दिसतात. समाजमाध्यमांवर राग व्यक्त करणा-या व्यक्ती दोन प्रकारांनी आपली मते मांडतात. पहिल्या प्रकारामध्ये समाजमाध्यमांवर त्यांनी स्वतःचे नाव आणि ख-या माहितीसह खाते उघडलेले असते आणि ते समाजमाध्यमांवर मोकळेपणाने मते मांडत असतात. परंतु, तिथेही एरवी जितक्या उघडपणाने एखादी व्यक्ती एखाद्या विषयावर व्यक्त होणार नाही त्यापेक्षा अधिक मोकळेपणाने समाजमाध्यमांवर व्यक्त होते असे दिसून येते. कोणत्याही विषयावर बेधडकपणाने प्रतिक्रिया देण्याची उत्स्फूर्तता तिथे दिसून येते. समाजमाध्यमांवर सक्रिय असणा-या व्यक्तीची विशिष्ट विचारधारा, तिची ठाम मते किंवा समजुती यांना छेद देणारे काही विषय समाजमाध्यमांवर आले की, आपलेच म्हणणे कसे योग्य आहे, हे ठसवण्यासाठी हिरीरीने मते मांडली जातात. त्या मतांना कुणी विरोध केला किंवा त्यांचा कुणी उपहास केला की मात्र जाहीर अवमान झाल्याची भावना निर्माण होऊन ती व्यक्ती अधिकाधिक रागाने प्रतिक्रिया देऊ लागते. अनेकदा तर एखाद्या विषयाची परिपूर्ण माहिती केवळ आपल्यालाच आहे हे ठसवण्यासाठी दुराग्रहाने मांडणी केली जाते. मात्र, त्या भूमिकेला विरोध करणारी मते मांडली गेली की मात्र समाजमाध्यमांवर असणा-या व्यक्तींना ते रुचत नाही आणि त्या कमालीच्या रागावतात, असे निरीक्षणांती अभ्यासकांच्या लक्षात आले आहे.

समाजमाध्यमांवर व्यक्त होणारी व्यक्ती प्रत्यक्षात समोर नसते. त्यामुळे पलीकडची व्यक्ती तिच्या आकलनाप्रमाणे लिहिलेल्या मजकुराचा अर्थ काढते आणि मग अनेकदा नेमका अर्थबोध न झाल्यानेदेखील मोठे संभ्रम निर्माण होतात. गैरसमजातून दोन व्यक्ती किंवा एकाच वेळी अनेक व्यक्ती एकमेकांशी भांडताना किंवा राग व्यक्त करताना समाजमाध्यमांवर दिसतात. दुस-या प्रकारात समाजमाध्यमांवर सक्रीय असूनही काही व्यक्ती आपली खरी ओळख लपवतात. बनावट खाती तयार करून ती समाजमाध्यमांवर सतत 'ऑनलाइन' सक्रिय असतात. विविध प्रकारची चुकीची माहिती पसरवण्याबरोबरच अधिक आक्रमकतेने व्यक्त होताना दिसतात. समाजमाध्यमांवर ओळख लपवणा-या व्यक्ती अधिक रागाने व्यक्त होतात असेही



अभ्यासांती दिसून आले आहे. कोणालाही आपण दिसत नसल्याने कसेही व्यक्त झाले तर चालू शकते अशी मानसिकता या गटातील व्यक्तींची असते. रागाच्या भरात एखाद्या व्यक्तीचे चारित्र्यहनन करणे, अपशब्दांची लाखोली वाहणे, हीन दर्जाची टीका करणे, अर्वाच्य भाषा वापरणे असे प्रकार त्यामुळेच वाढलेले दिसतात.

या संदर्भातील मानसिकता समजून घेण्यासाठी अमेरिकेतील एक प्राध्यापक Ed Diener यांनी १९७६ साली एक प्रयोग केला होता. ओळख लपलेली अथवा लपवलेली असेल तर माणूस चुकीच्या गोष्टी अधिक आक्रमकतेने आणि आवडीने करतो का याचा अभ्यास त्यात करण्यात आला होता. किशोरवयीन १३०० मुले या प्रयोगासाठी निवडण्यात आली. त्यातील काही मुलांना मुखवटे देऊन त्यांची खरी ओळख लपवण्यात आली तर काहींना मुखवटे दिलेले नव्हते. या सर्व मुलांना एका जागी एकत्रितपणे सोडले आणि तिथे ठेवलेल्या काही गोष्टी चोरण्यास सांगितले. त्या प्रयोगादरम्यान असे लक्षात आले की, ज्या मुलांनी मुखवटे परिधान केलेले होते ती मुले अधिक मोकळेपणाने जास्त चोरी करताना दिसली. तर ज्यांची ओळख लपत नव्हती ती मुले चोरी करायला चटकन धजावत नव्हती. व्यक्तीची ओळख लपवलेली असेल तर चुकीच्या गोष्टी सररासपणाने होऊ शकतात. समाजमाध्यमांच्या खुल्या व्यासपीठावर ओळख लपवल्यानंतर नेमके हेच होत असावे, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. त्यामुळेच बनावट खाती उघडून समाजमाध्यमांवर सक्रिय असणा-या लोकांची संख्या एकूणच जगभरात प्रचंड आहे.

**नैराश्य आणि अस्वस्थता**

समाजमाध्यमांच्या अतिरिक्त वापरामुळे माणसाला नैराश्य आणि अस्वस्थता या दोन बाबींना सामोरे जावे लागते. समाजमाध्यमांच्या विविध व्यासपीठांचा वापर जितका अधिक तितके नैराश्य आणि अस्वस्थतेचे प्रमाणही अधिक असे अभ्यासांती दिसून आले आहे. समाजमाध्यमांवर सातत्याने काही ना काही माहिती येऊन पडत असते. सर्वच माहिती उपयोगाची असतेच असे नाही. हळूहळू या माहितीचा भडिमार जसा वाढतो तशी व्यक्तींमधील प्रतिक्रियावादी भूमिका वाढू लागते. येणा-या माहितीला काही ना काही प्रतिसाद द्यावा व मुद्दा न पटल्यास प्रत्युत्तर द्यावे, खंडन करावे याची चढाओढ सुरू होते. हीच धोक्याची घंटा असते आणि त्यातूनच व्यक्तींमध्ये नैराश्य आणि अस्वस्थता यांचे प्रमाण वाढत असल्याचे अभ्यासक सांगतात. समाजमाध्यमांवरील चर्चेमध्ये वाद अनेकदा विकोपाला जातात. चांगले संबंध दुरावले जातात. संवाद संपून

विसंवाद वाढीस लागतो. भाषेतील सभ्यता संपून एकमेकांची उणीदुणी काढली जातात. अर्वाच्य भाषेत अवमान केला जातो. संबंधित व्यक्तींच्या मानसिकतेवरही या सगळ्याचा आघात होत असतो त्यामुळे हे दुष्परिणाम टाळण्यासाठी समाजमाध्यमांचा तारतम्यानेच वापर करणेच श्रेयस्कर होय, असे जाणकारांचे मत आहे.

**'ट्रोलिंग' : रागाचे विकृत रूप**

समाजमाध्यमांवरील रागाचेच एक विकृत रूप म्हणजे 'ट्रोलिंग'. समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ 'ट्रोलिंग' या प्रकाराचा जगभरात खूप गांभीर्याने अभ्यास करीत आहेत आणि त्या मागची मानसिकता समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. समाजमाध्यमांवर इतक्या मोठ्या प्रमाणावर 'ट्रोलिंग' कसे होते? 'ट्रोलिंग' करणा-यांची मानसिकता काय असते? आपल्याला माहित असलेल्या किंवा नसलेल्या व्यक्तीला दुखावून नक्की कोणता आनंद मिळत असतो? एखाद्याच्या भावना दुखावतील किंवा त्याची मनःस्थिती विचलित होईल अशा भाषेत संवाद साधल्याने नक्की कुठल्या प्रकारचे समाधान मिळते? अशा पद्धतीचे लिखाण समाजमाध्यमांवर केल्याने 'ट्रोलिंग' करणा-यांना कुठली उद्दिपना मिळत असते? अशा प्रकारच्या टीकात्मक आणि नकारात्मक मानसिकतेचा 'ट्रोलिंग' करणा-यांच्या व्यक्तिगत आयुष्यावर काही विपरित परिणाम होतो का? दुस-याला सतत नामोहरम करण्याची, अवमानित करण्याची, दुस-यांचा शाब्दिक छळ करण्याची आणि अंतिमतः त्या व्यक्तीला शक्य तितका त्रास देण्याची वृत्ती नेमके काय अधोरेखित करते आणि जर याचे परिणाम अंतिमतः चांगले नसतील तर त्याचे समाजमाध्यमांवरील प्रमाण का वाढत चालले आहे?... या आणि अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नांत अभ्यासक आहेत.

राजकीय पक्षांच्या दावणीला बांधलेले 'पेड ट्रोलर्स' असतात त्याचप्रमाणे आता विविध विचारधारांशी कट्टर बांधिलकी असणारे अनेक नवे समूह तयार झालेले असून तेदेखील त्यांच्या विचारांशी साम्य न राखणा-या व्यक्तीच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर 'ट्रोलिंग' सुरू करतात असे दिसून येते. 'आमचेच विचार योग्य आहेत' हे सिद्ध करण्यासाठी 'ट्रोलर्स' कुठच्याही थराला जातात आणि टीका करतात. विचारांचा प्रतिवाद विचारांनी करण्याऐवजी हीन भाषेत टीका करून विरुद्ध विचार मांडणा-या व्यक्तींवर हे 'ट्रोलर्स' हल्ला चढवतात असे दिसून आले आहे. त्यामुळे समाजमाध्यमांवरील 'ट्रोलिंग' हा एक गंभीर विषय बनत चालला असून मानसोपचार तज्ज्ञांसाठीदेखील ते एक नवे आव्हान ठरते आहे. परिचितांमधील आणि सभ्य वाटणा-या



व्यक्तीदेखील या 'ट्रोलिंग'च्या आहारी जात असल्याचे जागतिक स्तरावर होत असलेल्या पाहणीतून निष्पन्न होऊ लागले आहे. 'ट्रोलर्स'च्या मानसिकतेचा अभ्यास जगभरात सुरू आहे. इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या उदयानंतर माणसाच्या व्यक्त होण्याच्या पद्धतीत जे महत्त्वपूर्ण बदल झाले त्यातील हा एक लक्षणीय बदल आहे, असे मानले जाते आहे.

कॅनडामधील काही संशोधकांनी २०१५ साली सुमारे दीड हजार 'ट्रोलर्स'वर संशोधन केले होते. त्यातील बहुतांश 'ट्रोलर्स'नी सांगितले होते की, त्यांना 'ट्रोलिंग' या प्रकारात एक सुप्त आनंद मिळतो. लैंगिक बळजबरीचे वर्णन, गलिच्छ शब्दांत केलेली टीका, एखाद्या व्यक्तीविषयी व तिच्या कुटुंबियांविषयी वाईट भाषेत लिहिणे, एखाद्याचे जगणे नकोसे होईल अशा पद्धतीने सातत्याने त्रास देत राहणे या सर्व प्रकारांमध्ये 'ट्रोलिंग'द्वारे आनंद मिळतो असे त्यांनी या अभ्यासादरम्यान सांगितले होते. समाजात वावरत असताना सामाजिक संकेतांची एक अदृश्य भिंत आपल्या समोर कायम असते. त्यामुळे माणसे संयमाने वागतात. परंतु, 'ऑनलाइन' वावरामध्ये ही भीती गळून पडत असावी. 'ना कुणाची भीती ना कशाविषयी लाज' अशी अनेकांची मनःस्थिती निर्माण होत असावी आणि तेच लोक पुढे जाऊन कशाचाही विधीनिषेध न बाळगता 'ट्रोलिंग'च्या आहारी जात असावेत, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. Nottingham येथील अभ्यासक प्रा. मार्क ग्रिफिक्स यांनी या मनोवृत्तीचा अभ्यास करून या प्रकाराला Disinhibition Behavior असे नाव दिलेले आहे. त्यांच्या मते, या प्रकारातील लोकांचा असा समज असतो की आपण कुणाशीही कसेही बोललो तरी काहीही फरक पडत नाही. अशा प्रकारात जमा होणारी माणसे जेव्हा एकटी असतात किंवा समाजात वावरत असतात त्या वेळी खूप वेगळी असतात; परंतु, समाजमाध्यमांवर सक्रिय होताना तेव्हा मात्र त्या एकदम बदलून जातात.

समाजमाध्यमांवरील रागाचे हे वाढते प्रकार पाहता 'ऑनलाइन' संवादासाठीसुद्धा काही नियमावली असावी, असा विचार आता पुढे येऊ लागला आहे. मोठ्यांचा आदर राखणे, अश्लील शब्दांचा वापर न करणे, संवादात किमान सभ्यता बाळगणे या अलिखित संकेतांचा वापर समाजात वावरताना केला जातो. तेच भान समाजमाध्यमांवर संवाद साधतानाही राखले जावे ही अपेक्षा गैर नाही. परंतु, ते साधायचे कसे हे आजच्या घडीचे सर्वांत मोठे आव्हान आहे. तूर्तास तरी, या 'ऑनलाइन' रागाचे करायचे काय हा प्रश्न सगळ्यांच्याच पुढ्यात उभा ठाकलेला आहे. ■■

# चिनी आक्रमकतेमागील मानसिकता

आंतरराष्ट्रीय स्तरावरील चिनी वागणूक दिवसेंदिवस अधिकच उद्दाम आणि हडेलहप्पीपणाची होत चालली असल्याचे अनेकानेक उदाहरणांवरून अलीकडील काही वर्षांत वारंवार सिद्ध होते आहे. हाँगकाँगमधील लोकशाहीवर वरवंटा फिरवणे हा तर त्या बेगुमानपणाचा अगदी अलीकडील पुरावा. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी चीनसंदर्भातील अमेरिकी धोरणामध्ये त्यांच्या कार्यकालादरम्यान अपूर्व असे बदल घडवून आणल्यानंतर चीनच्या एकंदरच परराष्ट्रीय धोरणाचा कल काहीसा बुचकळ्यात टाकणारा बनू लागल्याचे अनेक अभ्यासकांचे निरीक्षण सांगते. चीनचे विद्यमान सर्वेसर्वा शी जिनपिंग यांनी सत्तेची सारी सूत्रे स्वतःच्या हातात एकवटल्यापासून तर चीनचा नूर अलीकडील काळात लक्षणीयरीत्या बदललेला आहे. किंबहुना, जागतिक पटलावर चीन धारण करत असलेल्या आक्रमक पवित्र्याच्या मुळाशी असणारा उद्दामपणा जिनपिंग यांच्या सत्ताउदयाशी जोडलेला आहे, असेही काही विश्वषकांचे विवेचन आहे. चीनचे चढाईखोर धोरण आणि जिनपिंग यांच्या पोलादी नेतृत्वाची चढती कमान या दोहोंत एक प्रकारचा आंतरिक संबंध आहे, यांबाबतही अमेरिकेतील काही पत्रकारांचे तसेच चीन आणि अमेरिका यांच्या परस्परसंबंधांचा विशेषाभ्यास असणा-या निरीक्षकांचे ब-यापैकी मतैक्य दिसते.

विशेषतः दक्षिण आशियामध्ये स्वतःचे एकतंत्री वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या हेतूने चीन ज्या पद्धतीने शेजारी देशांबरोबर चढा सूर लावतो आहे त्यांवरून तर चीनच्या एकंदरच हेतूंबाबत सर्वत्र साशंकता दाटते आहे. भारताला तर त्यांपायी २०१७ सालापासून अनेक आघाड्यांवर संघर्षात्मक परिस्थितीचा सामना करावा लागतो आहे. डोकलाम आणि पॅन्गॉन्ग इथे उद्भवलेले बखेडे म्हणजे त्या अशांततेची दोन ताजी उदाहरणे.



साधारणपणे १९७७-७८ सालापासून जबरदस्त वेगाने जवळपास तीन ते साडेतीन दशके साध्य केलेला आर्थिक विकास आणि त्याच्या हातात हात घालून स्वतःचे सामरिक सामर्थ्य बुलंद बनविण्याच्या दृष्टीने अतिशय योजनाबद्ध रीतीने संरक्षणदलांची प्रहारक्षमता प्रखर बनविण्यासाठी सातत्याने खर्चाबाबत ओणवा राखलेला हात या दोहोंपायी चीनला आंतरिक आत्मविश्वास जाणवतो आहे, यांबाबत सगळ्यांचेच एकमत आहे. 'कोविड १९'च्या अतर्क्य अरिष्टापायी एकंदरच जागतिक अर्थव्यवस्था कमजोर झालेली असल्याने तर चीनच्या आत्मविश्वासाला खतपाणीच जणू लाभते आहे. प्रथम दक्षिण आशियामध्ये आणि क्रमाने जगामध्ये येत्या काळात तुल्यबळ प्रतिस्पर्धीच आपल्याला उरता कामा नये, या दीर्घकालीन सुप्त महत्वाकांक्षेने चीनची ही विचारसरणी भारित असल्याचेही काही विश्लेषकांचे विवेचन सांगते.

भारताबरोबर चीनने उकरून काढलेले सीमाप्रश्न हा त्याच व्यापक व्यूहरचनेचा एक भाग मानला जातो. २०१७ सालापासून चीन लडाख भागात सीमाप्रश्नांबाबत अधिकाधिक अरेरावी करत असल्याचे प्रकर्षाने दिसत असले तरी, एका प्रकारे, चिनी कागाळीची ती नवीन आघाडी ठरते. कारण, एकंदरच ईशान्य भारतातील सीमेसंदर्भात चीन अनेक वर्षांपासून कुरापती काढतोच आहे. अरुणाचल प्रदेशाला तर चीन थेट २००८सालापासूनच 'विवाद्य प्रदेश' म्हणून सरसहा संबोधत आवाज उठवतो आहे. भारताचे तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी २००८ साली अरुणाचल प्रदेशाला भेट देऊन 'भारतीय संघराज्यातील एक उगवते राज्य' असा त्याचा यथोचित जो गौरव त्या वेळी केला त्या बाबत चीनने लगोलग अधिकृतपणे नापसंती व्यक्त केली होती. अरुणाचल प्रदेश हा भारतीय संघराज्याचा एक अविभाज्य घटक असून देशाचे पंतप्रधान देशाच्या कोणत्याही भूभागास केव्हाही भेट देण्यास मुखत्यार आहेत, असा स्पष्ट खुलासा मग भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने लगोलग करून चिनी काव्याचा सज्जड प्रतिवाद केला. अरुणाचल प्रदेश आणि परिसरात भारत आणि चीन यांच्यादरम्यानच्या अधिकृत सीमारेषेचे उल्लंघन तर चीन सतत करतच असतो.

### *ईर्षा दक्षिण आशिया मुठीत राखण्याची*

भारतीय संघराज्यातील २५वे राज्य म्हणून अरुणाचल प्रदेश हे भू-राजकीय एकक २० फेब्रुवारी १९८७ या दिवशी अस्तित्वात आले. त्या आधी सुमारे दीड दशक, म्हणजे, २० जानेवारी १९७२ पासून अरुणाचलला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा बहाल करण्यात आलेला होता. परंतु, चीन मात्र या प्रदेशाला वादग्रस्त भूभागच मानतो. चीनच्या दृष्टीने त्याला सबळ असे कारणही आहे. मुळात, १९१४-१५ साली तत्कालीन ब्रिटिश शासक आणि तेव्हा स्वतंत्र असलेला तिबेट यांच्यादरम्यान, ब्रिटिश अंमलाखाली असणारा भारत आणि तिबेट यांच्यामधील सीमा म्हणून मॅकमोहन रेषा सिमला करारानुसार निश्चित करण्यात आली. ही मॅकमोहन रेषा म्हणजेच स्वतंत्र भारत व चीन यांची सीमा असल्याची भारताची भूमिका आहे. तर, सिमला करार आणि पर्यायाने तीच मॅकमोहन रेषा चीनला सीमारेषा म्हणून ठाम अमान्य आहे.

दक्षिण आशियामध्ये आपणच सर्वशक्तिमान असे एकमात्र राष्ट्र होत हे जगाच्या व्यासपीठावर प्रस्थापित करण्यासाठी चीन अलीकडील काळात अधिक हिरिरीने सक्रिय बनतो आहे. दुस-या महायुद्धानंतर जगभरात अस्तित्वात आलेल्या सत्तातोलाला आव्हान देण्याचा सुप्त मनसुबा याच्या मुळाशी आहे, असे विश्लेषकांचे विश्लेषण आहे. दक्षिण आशियावर एकतंत्री हुकुमत निर्माण करणे, हे आहे केवळ पहिले पाऊल. दक्षिण आशिया आपल्या मुठीत ठेवण्याची चीनची मनीषा स्पष्ट दिसू लागली ती जिनपिंग यांनी २०१२ साली सत्तासूत्रे स्वीकारल्यानंतर. आजघडीला दक्षिण आशिया हा अनंत प्रकारच्या विरोधाभासांनी व्यापलेला असा कदाचित एकमात्र भूभाग या पृथ्वीतलावर असावा. अण्वस्त्रसंपन्न राष्ट्रांचे अस्तित्व, वेगवान मानवी विकासासंदर्भातील प्रचंड अडचणी, पर्यावरणीय बदलांचे शेतीसह एकंदरच अर्थकारणावर प्रकर्षाने जाणविणारे संभाव्य प्रतिकूल परिणाम, शासनसंस्थेच्या विरोधात सशस्त्र उठाव करण्यासही न बिचकणा-या शक्तींच्या कारवाया...अशांसारख्या घटकांपायी हा संपूर्ण टापू कमालीचा संवेदनशील गणला जातो. परंतु, त्याच वेळी सक्षम आर्थिक विकासाच्या संधीही याच भूभागावर भरपूर प्रमाणात उपस्थित व उपलब्ध आहेत.



त्यामुळे जागतिक समुदायाची मोठी भिस्तही याच प्रदेशावर आहे. येती सुमारे ५० वर्षे तरी या परिसराला 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा लाभ खचितच मिळणार आहे. सक्षम क्रयशक्ती असणारा मध्यम वर्ग याच भूभागावर बहुसंख्येने एकवटलेला आहे. या बाजारपेठेची मोहिनी जगभरातील सगळ्यांच राष्ट्रांना न पडती तरच नवल. चीनला कब्जा हवा आहे तो याच सा-या अनुकूलतांवर.

भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमांना ज्या ज्या देशांच्या सीमा भिडलेल्या आहेत अशा सा-या देशांमध्ये सबुरीने, सामोपचाराने, अर्थशक्तीच्या किमयेद्वारे अथवा प्रसंगी दंडशक्तीच्या बळावर आपले तांब्याभांडे स्थिर करण्याच्या चिनी व्यूहरचनेमागे असणारे मूळ सूत्र नेमके हेच होय. दक्षिण आशियामध्ये एक भारत काय तो आपल्याला तुल्यबळ प्रतिस्पर्धी म्हणून उभा ठाकू शकतो, याची पुरेपूर जाणीव चिनी राज्यकर्त्यांना असल्यामुळेच भारताभोवतीचा वेढा आवळत राहण्याचे प्रयत्न त्यांनी जारी राखलेले आहेत.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

**धोरण, लहान देशांना मिंधे बनविण्याचे...**

मुळात, भारतीय बाजारपेठ आणि आर्थिक वाढविकासाच्या तिच्या ठायी वसणा-या दीर्घकालीन उदंड क्षमता व शक्यता यांवर चीनचा डोळा मुख्यत्वेकरून आहे. शेजारील राष्ट्रांबरोबरच्या झगड्यांत भारताला एकदा का गुंतवून ठेवले की पूर्व आशियाई देशांमध्ये वर्चस्व प्रस्थापित करणे भारताला अवघड होऊन बसेल, हा कावा या सगळ्या चिनी उपद्व्यापांच्या मुळाशी दिसतो. भारताचे शेजारी असणा-या देशांना आर्थिक मदत पुरवत राहणे, लष्करी बळ देणे, भारताविरोधात त्यांना चिथवत बसणे, एका प्रकारे भारतासंदर्भात प्रतिकूल अथवा विरोधी मानसिकता बळावलेल्या देशांचा वेढा भारताभोवती पक्का आवळून भारताची नाकेबंदी करण्याचा हा सारा कुटिल डाव आहे, असे आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अनेक अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. पाकिस्तानबरोबर अलीकडील काळात चीनने वाढवलेली सामरिक, आर्थिक तसेच राजनैतिक घसट हा त्याच सगळ्या विचारव्यूहाचा एक भाग होय.

भारत आणि चीन हे दोन बलदंड देश आशिया खंडामध्ये असल्यामुळे भारताचे शेजारी असणा-या लहान लहान देशांची अवस्था चिमटीत सापडल्यागत होते. एकीकडे त्यांना भारताचा आधार वाटतो परंतु त्याच वेळी भारतीय सामर्थ्याचा धाकही त्यांच्या मनीमानसी वसत राहतो. चीनच्या वळचणीला जाण्याचा पर्याय बांगला देश, नेपाळ, श्रीलंका यांसारखे भारताचे सख्खे शेजारी अवलंबताना दिसतात त्यांमागील मुख्य कारण काही असेल तर ते नेमके हेच. या देशांच्या त्या मानसिकतेचा अचूक लाभ उठवत, समांतर पद्धतीने, त्यांच्या आर्थिक विकासविषयक प्रकल्पांसाठी भरभक्कम अर्थसाहाय्य पुरवत चीन त्यांना आर्थिकदृष्ट्या आश्रित बनवून ठेवण्याची खेळी करतो आहे. अर्थसाहाय्याचा टेकू पुरवत असणारे देश प्रजासत्ताक राज्यव्यवस्था, मानवाधिकारांची जपणूक, पारदर्शक शासन, भ्रष्टाचारमुक्त कारभार यांसारख्या बाबींसंदर्भात कितपत संवेदनशील व दक्ष आहेत यांबाबत चीन फारशी फिकीर बाळगताना दिसत नाही. मुळात, या मूल्यांचे चीनलाच फारसे सोयरसुतक नसल्याने अन्य देशांच्याबाबतीत या संदर्भात चीन सोयीस्कररीत्या बोटचेपे धोरण सरसास अवलंबतो.



विकसनशील देशांना अर्थसाहाय्य करण्याबाबत उत्सुक असणा-या पाश्चिमात्य राष्ट्रांचा मुख्य रोख असतो तो नेमका याच बाबींवर. समाजजीवनातील तसेच प्रशासनविषयक हीच मूल्ये विकसित अशा पश्चिमी देशांच्या लेखी महत्त्वाची गणली जात असल्याने तिस-या जगातील विकसनशील देशांना अर्थसाहाय्याचा हात पुढे करते वेळी त्या मूल्यांच्या अंगीकाराची अपेक्षा गरजवंत देशाकडून धरली जाते. दक्षिण आशियातील तसेच आग्नेय आशियातील अनेक देशांना लोकशाही राज्यपद्धतीशी संलग्न अशा या विविध मूल्यांबाबत फारसे आकर्षण मुदलातच नसल्याने, त्यांच्या तामिलीबाबत कोणताही आग्रह न धरणारा चीन अन्य पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेत त्यांना सोयीचा धनको वाटला नाही तरच नवल. त्यांमुळे, अर्थसाहाय्याचा चिनी पर्याय हे त्यांच्या लाभाचे कूळ शाबीत होते. असा हा उभयपक्षी सोयीचा व्यवहार ठरतो.

भूपृष्ठीय रस्ते, रेल्वे तसेच समुद्रमार्गाने आफ्रिका तसेच युरोप या दोन खंडांशी आशिया खंडाला जोडणा-या विशाल अशा दळणवळणाच्या जाळ्याची निर्मिती करण्याचे महाकाय उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून चीनने प्रवर्तित केलेला महत्वाकांक्षी असा Belt and Road Initiative हा जिनपिंग यांच्या परराष्ट्रीय धोरणाचा जणू गाभाच समजला जातो. पायाभूत सेवासुविधांचा विकास घडवून आणण्यासंदर्भातील या प्रचंड व्यापक अशा प्रस्तावित प्रकल्पाच्या माध्यमातून या पट्ट्यातील तब्बल ७० देशांशी चीनचे गुंतवणूकविषयक तसेच आर्थिक व्यवहारविषयक संबंध प्रस्थापित होणार आहेत. याच्याच जोडीने पाकिस्तानबरोबर आर्थिक सहकार्य करत चीन आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान Economic Corridor निर्माण करण्याचा प्रकल्पही चीनने कार्यान्वित बनविलेला आहे. दुसरीकडे, पाकिस्तानला लष्करी बळ पुरविण्याचे चीनचे काम चालूच आहे. येनकेनप्रकारेण भारतावर दबाव राखत राहणे, हा चीनचा हेतू या सा-यातून पुरेसा स्पष्ट होतो. एकाच वेळी दोन-दोन आघाड्यांवर लष्करी संघर्ष ओढवून घेण्याचे भारत टाळेलच, हा साधा हिशेब या सा-याच्या मागे आहे. अशा प्रकारे दबाव टिकवून धरत त्याच्या आधारे सीमावाद तसेच तथाकथित वादग्रस्त भूभागांसंदर्भातील आपले दावे पुढे रेटत राहण्याची चीनची ही खेळी आहे.

**दक्षिण चिनी समुद्रातील घुसखोरी**

सागरी वाहतूक तसेच देशोदेशींच्या सागरी सीमांसंदर्भातील आंतरराष्ट्रीय कायद्यांचे अन्वयार्थ प्रचलीत चौकटींमध्ये समजावून घेण्यास चीनने दिलेला सपशेल नकार या संदर्भात अतिशय सूचक आहे. दक्षिण चिनी समुद्रामध्ये चीनने केलेली उद्दाम हडेलहप्पी त्याच्या त्याच मानसिकतेची द्योतक होय. या सामुद्री प्रदेशातील काही बेटांवर कब्जा करत बांधबंदिस्तीला वेग देत चीनने तिथे नाविक तळांची उभारणी चालू करणे, याला फार मोठा अर्थ आहे. कमालीच्या ऊर्जासघन अशा चिनी आर्थिक विकासाची भविष्यकालीन ऊर्जाभूक भागविण्याच्या दृष्टीने कळीचे ठरणा-या नैसर्गिक वायू तसेच कच्च्या खनिज तेलाचे भलेथोरले साठे दक्षिण चिनी सामुद्री परिसरातील काही भूगर्भांमध्ये दडलेले आहेत. आजमितीस, चीनच्या एकंदर वार्षिक ऊर्जागरजेपैकी जवळपास तब्बल ३९ टक्के गरज याच भागातील ऊर्जास्त्रोतांद्वारे भागविली जाते. जागतिक स्तरावर समुद्रमार्गे होणा-या एकंदर वार्षिक मालवाहतुकीपैकी तब्बल एक तृतीयांश वाहतूक याच भागामधून होत असते. साहजिकच, सागरी तळांची भक्कम बांधणी केली की या सगळ्या परिसरावर हुकूमत राखणे चीनला सहजसाध्य ठरेल. प्रसंगी, कोणत्याही अन्य राष्ट्राच्या लष्करी आरमाराचे चलनवलन व प्रवेशही या भागात रोखण्याइतपत सागरी सामर्थ्य चीनच्या खात्यावर यथावकाश जमा होईल.

माओपर्वाच्या अस्तानंतर चीनचे सर्वेसर्वा म्हणून डेंग झिआओ पिंग यांनी सत्तासूत्रे हाती घेतली ती १९७८ सालातील सप्टेंबर महिन्यात. निक्सन यांनी १९७२ साली चीनला दिलेल्या भेटीद्वारे पाश्चिमात्य राष्ट्रांमधील घडामोडी निरखण्याची खिडकी चीनसाठी खुली झालेली होती. दुस-या महायुद्धानंतर विकसित पश्चिमी देशांनी ज्या धडाडीने आर्थिक तसेच तंत्रशास्त्रीय प्रगती साध्य केली तिच्यावरून बोध घेत चीनला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यावर डेंग यांनी सर्व शक्ती एकवटल्या. शांततेखेरीज अर्थविकास साध्य होत नसतो इतके व्यावहारिक ज्ञान पदरी असलेल्या डेंग यांनी देशात अथवा देशाबाहेर कोणाशीही संघर्षाच्या ठिणग्या उडू नयेत याची दक्षता घेणारी राजनैतिक धोरणे त्यांच्या कारकिर्दीदरम्यान राबविली.



सक्षम आर्थिक घोडदौडीचे ते पर्व डेंग यांच्यानंतर आलेल्या चीनच्या सत्ताधा-यांनी जवळपास पुढील तीन दशके नेटाने राबविले. भरधाव विकासाद्वारे हस्तगत झालेल्या समृद्धीचा विनियोग चिनी लष्कराच्या पुनर्बांधणीसाठी डोळसपणे करून चीनला सामरिकदृष्ट्याही समर्थ बनवण्यावर धोरणकर्त्यांनी कटाक्ष राखला. वैश्विक व्यासपीठावर आक्रमक हटवादी भूमिका घेण्याइतपत चीनला आज जाणवत असलेला आत्मविश्वास म्हणजे याच सा-या प्रक्रियेची फलश्रुती. उभ्या जगाला एक वेगळा संदेश देण्याच्या मानसिकतेमध्ये चीन आज दिसतो आहे तो नेमक्या त्याच आत्मविश्वासाच्या बळावर.

जागतिक समुदायाला द्यावयाच्या संदेशाचे प्रगटीकरण घडवून आणण्यासाठी चीनने मोका साधला तो हाँगकाँगवासियांच्या स्वातंत्र्याचा परवाच्या मार्च महिन्यातील दुस-या आठवड्यात घास घेण्याच्या रूपाने. हाँगकाँगमधील लोकशाहीवर वरवंटा फिरवत असतानाच, आपल्या आक्रमक पवित्र्याबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड करण्याच्या मनःस्थितीमध्ये आपण नाही, हेच जणू त्या अतिक्रमणाद्वारे चीनने उभ्या जगाला बजावले. या सगळ्यांपायी, चीनसह एकंदरच वैश्विक समुदायाच्या पुढ्यात बिकट असा एक दुपेडी पेच उभा ठाकतो आहे. त्याचे रंगरूप नीट समजावून घेणे गरजेचे आहे.

जागतिक व्यापार संघटनेचे दरवाजे चीनसाठी २००१ साली खुले करत असताना पश्चिमी राष्ट्रांनी एक अपेक्षा मनामध्ये बाळगलेली होती. चिनी आर्थिक पुनर्रचना पर्वाद्वारे तिथे अवतरलेली सुबत्ता आणि जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यत्वाद्वारे खुल्या होणा-या बहुदेशीय मुक्त व्यापाराच्या वाढत्या संधी यांतून पाश्चिमात्य संस्कृतिमूल्यांशी चिनी नागरिकांचा संपर्क सखोल बनेल आणि परिणामी लोकशाहीपूरक वृत्ति-प्रवृत्तींना चीनमध्ये पाळेमुळे बळकटपणे रुजविता येतील, असे होते त्या आशावादाचे स्वरूप. सोव्हिएत संघराज्याच्या विघटनापासून लोकशाहीवादी शक्ती आणि विचारधारा यांचा पाठपुरावा करणा-या मानसिकतेचा फैलाव जगाच्या विविध भागांत वाढता राहिला. नव्या चिनी पिढीला त्या विचारसरणीच्या आकर्षणापासून अलिप्त कसे राखायचे, हा पेच चिनी धोरणकर्त्यांच्या पुढ्यात उद्भवला तो नेमका याचमुळे. ***(कृपया पृष्ठ क्रमांक २६ पाहावे)***

आर्थिक

# राज्य सरकारांचे वित्तीय वास्तव

भारतासारख्या संघराज्य व्यवस्थेमध्ये केंद्र सरकारच्या वित्तीय व्यवस्थापनाइतकेच राज्य सरकारांचे वित्तीय व्यवस्थापनही काटेकोरपणे केले जाणे गरजेचे असते. प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण यांसारखे सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने कळीचे ठरणारे विषय राज्य सरकारांच्या अखत्यारीमध्ये येत असल्यामुळे राज्यांवर खर्चाचा भार त्यांच्या महसुलाच्या तुलनेने अधिक असतो. केंद्र सरकारच्या अखत्यारीमध्ये असणा-या महसुलाच्या बाबी या राज्य सरकारांच्या तुलनेने अधिक लवचीक असतात. परिणामी, वित्तीय व्यवस्थापन काटेकोरपणे करताना राज्य सरकारांना तारेवरची कसरत करणे भाग पडते. साहजिकच, आपापल्या वित्तीय व्यवस्थेचे नियमन व व्यवस्थापन राज्य सरकारे किती काटेकोरपणे करतात, ही बाब देशाच्या एकंदर अर्थव्यवस्थेच्या लेखीदेखील संवेदनशील ठरते. भारतीय रिझर्व्ह बँक अलीकडील काळात राज्य सरकारांच्या वित्तव्यवस्थेचा लेखाजोखा सादर करणारा एक अहवाल दरवर्षी प्रकाशित करत असते. राज्यांच्या अंदाजपत्रकांमध्ये सादर करण्यात आलेल्या अधिकृत सांख्यिकीचे संकलन आणि विश्लेषण यांवर सदर दस्तऐवजातील विवरण बेतलेले असते. दस्तुरखुद्द राज्य सरकारांच्या अंदाजपत्रकांत नमूद केलेली आकडेवारी आणि भारतीय रिझर्व्ह बँकेसारख्या संस्थेने तिचे केलेले विश्लेषण या दोहोंपायी हे दस्तऐवज एक मोलाचा व तितकाच विश्वसनीय संदर्भस्त्रोत म्हणून गणले जातात.

सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठीची विविध राज्य सरकारांची वित्तीय सांख्यिकी विश्लेषित स्वरूपात सादर करणारा असा जो अहवाल भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रकाशित केलेला आहे, त्यांत नमूद काही महत्त्वाच्या बाबींची नोंद घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे. २१व्या शतकातील दुसरे दशक सरत असताना देशातील राज्य सरकारांचे सरासरी वित्तीय चित्र कसे दिसते, याचे उद्बोधक आकलन त्यांमुळे शक्य व सुकर बनते.



वित्तीय तुटीचे राज्याच्या ठोकळ उत्पादिताशी असणारे सरासरी प्रमाण, हे राज्य सरकारच्या वित्तीय व्यवस्थापनाच्या काटेकोरपणाचे एक गमक गणले जाते. त्या दृष्टीने २०१७-१८ आणि २०१८-१९ या दोन वित्तीय वर्षांसाठीच्या आकडेवारीची छाननी केली असता, एकंदरीनेच वित्तीय तुटीचे सरासरी प्रमाण राज्य ठोकळ उत्पादनाच्या तीन टक्क्यांच्या आत राखण्याबाबत राज्य सरकारांना समाधानकारक यश प्राप्त झालेले असल्याचे हा अहवाल सांगतो. २००३ साली संसदेने राजकोषीय उत्तरदायित्व विधेयक मंजूर केले. केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांच्या वित्तीय तुटीचे अनुक्रमे देशाच्या व राज्याच्या ठोकळ उत्पादिताशी असणारे प्रमाण तीन टक्क्यांपेक्षा अधिक वाढू नये, असा दंडक राज्यकोषीय उत्तरदायित्व कायद्याच्या माध्यमातून आता मान्य व स्वीकृत करण्यात आलेला आहे. त्या दृष्टीने, राज्य सरकारांच्या वित्तीय तुटीचे सरासरी प्रमाण राज्य ठोकळ उत्पादिताच्या तीन टक्क्यांपेक्षा कमी राहिलेले दिसते, ही समाधानकारक बाब ठरते.

परंतु, हे समाधान निर्भेळ गणता येत नाही. या रुपेरी वास्तवाला काळी किनार आहे. ती अशी की, सरकारी खर्चावर नियंत्रण राखत वित्तीय तुटीचे सरासरी प्रमाण राज्य ठोकळ उत्पादनाच्या तीन टक्क्यांच्या आतच राखण्यासाठी राज्य सरकारांनी कात्री लावलेली दिसते ती भांडवली खर्चाला. एकूण सरकारी खर्चाला आवर घालण्यासाठी भांडवली खर्चाकडे हात आखडता घेणे, हे राज्यांच्या दीर्घकालीन आर्थिक हिताच्या दृष्टीने बाधक ठरणारे पाऊल होय. ज्या सरकारी खर्चाद्वारे अर्थव्यवस्थेतील उत्पादक स्वरूपाच्या मालमत्तेमध्ये वाढ घडून येते असा खर्च भांडवली स्वरूपाचा खर्च गणला जातो. अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण होणारी भांडवली मालमत्ता अर्थव्यवस्थेच्या उत्पादक क्षमतांचे भरणपोषण घडवून आणत असते. भांडवली खर्चाला लगाम घातला जाणे म्हणजे एक प्रकारे राज्याच्या अर्थव्यवस्थेतील उत्पादक शक्तींचे व क्षमतांचे कुपोषणच होय. याचा प्रतिकूल परिणाम राज्याच्या विकासविषयक क्षमतांवर दीर्घकालामध्ये जाणवतो. त्यांमुळे, भांडवली खर्चाला मर्यादा घालून वित्तीय तुटीचे व्यवस्थापन करणे, ही अंतिमतः स्पृहणीय बाब ठरत नाही. देशातील राज्य सरकारांच्या खर्चाची गुणवत्ता सरासरीने खालावत असल्याचे ते लक्षण मानावे लागते

**चिंतनीय तितकाच चिंताजनक 'पॅटर्न'**

अलीकडील काळात राज्य सरकारांच्या लेखी मुख्य आव्हान हेच ठरते आहे. वित्तीय तुटीचा खड्डा भरून काढण्यासाठी कर्जउभारणी करावी लागणे, हे ओघानेच आले. त्यासाठी राज्य सरकारे वळतात भांडवल बाजाराकडे. सन २००१-०२ ते २०१६-१७ या संपूर्ण काळाचा विचार करता, वित्तीय तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारांनी केलेल्या एकंदर कर्जउभारणीमध्ये, खुल्या भांडवली बाजारपेठेतून उभारलेल्या कर्जांचे सरासरी प्रमाण भरते ५२.३ टक्के इतके. कर्जाऊ रकमांचा विनियोग, राज्य सरकारे, अधिककरून भांडवली खर्च कडे करताना दिसतात, ही झाली या सगळ्यांतील त्यांतल्यात्यांत समाधानाची बाब. केंद्र सरकारच्या तुलनेत, ही प्रवृत्ती म्हणा वा प्रेरणा, राज्य सरकारांमध्ये अधिक असल्याचे संबंधित आकडेवारी स्पष्ट करते. राज्यांच्या अर्थव्यवस्थांच्या उत्पादक क्षमतांचे दीर्घकालीक भरणपोषण घडून येण्याच्या दृष्टीने ही बाब उपकारक ठरते.

एकीकडे हे चित्र असे दिसत असले तरी, राज्य सरकारांच्या वित्तीय व्यवस्थापनासंदर्भात अलीकडील काही वर्षांत दृष्टोत्पत्तीस येणारा एक 'पॅटर्न' जितका चिंतनीय तितकाच चिंताजनकही शाबीत होतो. २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वित्तीय वर्षांसाठीची आकडेवारी संदर्भासाठी इथे घेतलेली आहे. राज्य सरकारांच्या महसुलासंदर्भात जे अंदाज अर्थसंकल्पांमध्ये मांडण्यात येतात त्यांपेक्षा प्रत्यक्षातील महसूल संकलन कमी भरते. परिणामी, वित्तीय तूट वाढण्याची संभाव्यता उभी ठाकते. राजकोषीय उत्तरदायित्व कायद्याच्या तरतुदींची तामिली करण्याची बांधिलकी असल्यामुळे वित्तीय तुटीवर नियंत्रण राखण्यासाठी खर्चाला कात्री लावली जाते. पर्यायाने राज्य सरकारांच्या अंदाजपत्रकांचे आकारमान आकुंचते. सरकारी खर्चाचा अर्थव्यवस्थेला लाभणारा टेकू ढिला पडला की अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा दर ढेपाळतो. आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला की करमहसुलावर लगोलग प्रतिकूल परिणाम दिसून येतो. साहजिकच, तुटीची दरी रुंदावते. कारण, राज्य सरकारांच्या खर्चाची बाजू त्या मानाने अ-लवचीक असते. तुटीची तोंडमिळवणी करण्यासाठी कर्जे उभारणे राज्यांना भाग पडते. या सा-यांतून कर्जे निभावून नेण्याच्या राज्यांच्या क्षमतेची कसोटी लागते.



देशातील राज्य सरकारांच्या वित्तीय साधनसामुग्रीची संरचना हाही या एकंदर चित्राचा एक दुर्लक्षता न येण्याजोगा पैलू ठरतो. राज्य सरकारांच्या अखत्यारीत असणा-या करांद्वारे तसेच करेतर स्त्रोतांमार्फत राज्यांच्या तिजोरीत जमा होणारा महसूल आणि केंद्र सरकारकडून हस्तांतरित होणारा निधी, असे दोन मुख्य घटक या संदर्भात दिसतात. केंद्र सरकारकडून हस्तांतरित होणा-या निधीमध्येही पुन्हा दोन प्रकार आहेत. केंद्र सरकार जमा करत असलेल्या करमहसूलातील जो हिस्सा राज्य सरकारांमध्ये वितरित करावयाचा असतो त्या अंतर्गत उपलब्ध होणारा निधी आणि अनुदानांच्या स्वरूपात केंद्र सरकारकडून मिळणारा पैसा हे ते दोन स्त्रोत. राज्य सरकारांच्या एकंदर जमेच्या या दोन मुख्य घटकांमध्येही अलीकडील काळात मोठे अभ्यसनीय प्रवाह दृग्गोचर होतात.

राज्यांच्या अखत्यारीत महसुलाचे राज्य ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी प्रमाण १९९०च्या दशकाच्या अखेरीपासून एकंदरीने चढती श्रेणी दाखविते. हा कल साधारणपणे २१व्या शतकातील पहिल्या दशकाच्या उत्तरार्धापर्यंत कायम राहिल्याचे संबंधित आकडेवारी स्पष्ट करते. अमेरिकी 'सब्प्राइम' कर्जांपायी वैश्विक अर्थव्यवस्थेला जो जबर दणका २००८ साली बसला त्यांपायी उद्‌भवलेल्या अरिष्टापायी राज्य महसुलाचे राज्यांच्या ठोकळ उत्पादनाशी असलेले सरासरी गुणोत्तर प्रमाण क्रमाने उतरणीचा कल दर्शवू लागले. हे चित्र जवळपास २०१०-११ सालापर्यंत तसेच राहिले. परंतु, त्या नंतर हे चित्र पुन्हा पूर्वपदावर येत असल्याचे संकेत आकडेवारीवरून मिळतात.

या प्रक्रियेला टेकू लाभला तो १४व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींद्वारे. केंद्र सरकारच्या तिजोरीमध्ये संकलित होणा-या एकूण करमहसुलापैकी जो हिस्सा राज्य सरकारांकडे हस्तांतरित करावयाचा त्या हिश्श्यामध्ये १४व्या केंद्रीय वित्त आयोगाने १० पर्सेन्टेज् पॉइंट्स्‌ची घसघशीत वाढ घडवून आणली. पाठोपाठच, २०१७ सालातील जुलै महिन्यापासून अस्तित्त्वात आणल्या गेलेल्या वस्तू आणि सेवाकराच्या व्यवस्थेखातर राज्य सरकारांना देय असणा-या भरपाईची रक्कमही राज्यांना मिळू लागली. त्यांतून राज्यांच्या महसुलाचे सहमजबुतीकरण शक्य बनले.

**चित्र, राज्यांच्या करमहसुलाचे**

राज्य सरकारांच्या अखत्यारीत असलेल्या करांद्वारे जमा होणा-या महसुलामधील प्रवाह आणि कलही रोचक व अभ्यसनीय ठरतात. स्वतःच्या अंमलाखाली असणा-या करांच्या आकारणीद्वारे जमा होऊ शकणा-या महसुलाच्या संकलनासंदर्भात देशातील विविध राज्यांची क्षमता साहजिकच निरनिराळी दिसते. राज्यांच्या अखत्यारीतील करांद्वारे राज्यांच्या तिजोरीमध्ये गोळा होणा-या महसुलाचे राज्यांच्या ठोकळ उत्पादनाशी भरणारे सरासरी प्रमाण राज्यवार पाहू गेल्यास सर्वांत पहिल्या स्थानावर दिसतो आंध्र प्रदेश. २०१०-११ ते २०१७-१८ या संपूर्ण कालावधीदरम्यान हे प्रमाण १२ टक्क्यांच्या परिघात राहिलेले दिसते. ईशान्येकडील राज्यांच्याबाबतीत मात्र हे चित्र दिसते अगदी याच्या उलटे. मुळात ही राज्ये आकारमानाने लहान-लहान असल्याने त्यांचा करांचा पाया खूपच सीमित आहे. परिणामी, करसंकलनाची या राज्यांची क्षमतादेखील मर्यादित शाबीत होते. साहजिकच, महसुलाच्याबाबतीत या राज्यांचे अवलंबन अधिककरून दिसून येते ते केंद्र सरकारकडून हस्तांतरित होणा-या महसुलावरच. राज्यांच्या अंमलाखालील करांद्वारे राज्यांच्या तिजोरीत संकलित होणा-या महसुलाचे राज्य सरकारांच्या एकंदर महसुलामध्ये असणारे सरासरी प्रमाण, देशपातळीवर, सर्वसाधारणपणे ४५ टक्के इतके भरते.

करमहसुलाचा विचार करता, राज्यांच्याबाबतीत, दोन कर मुख्य असल्याचे आकडेवारीवरून ध्यानात येते. वस्तू आणि सेवांवर आकारले जाणारे कर ( विक्री कर, मूल्यवर्धन कर पूर्वी आणि आता वस्तू व सेवा कर) आणि मुद्रांक शुल्क हे ते दोन कर होत. या दोन करांद्वारे जमा होणा-या महसुलाचे राज्यांच्या एकंदर करमहसुलात असणारे सरासरी प्रमाण भरते जवळपास ५० टक्के इतके. २००९-१० ते २०१९-२० या पु-या दशकभरासाठीची सांख्यिकी बघितली तर, राज्यांच्या स्वतःच्या करमहसुलातील वाढीचा वार्षिक सरासरी दर १४.७ टक्के इतका राहिल्याचे ध्यानात येते. खर्चांच्या आघाडीवरील वाढत्या व बदलत्या मागण्या ध्यानात घेता, करांची उद्धरणशक्ती (Tax-Buoyancy) सक्षम बनविण्यासाठी प्रयत्नशील राहणे, हे राज्य सरकारांसाठी इथून पुढे अनिवार्य ठरत राहील.



भारतीय अर्थव्यवस्थेतील अप्रत्यक्ष करांच्या संरचनेमध्ये १ जुलै २०१७ या दिवशी एक ऐतिहासिक स्थित्यंतर घडून आले. 'एक राष्ट्र-एक कर-एक बाजारपेठ' या तत्वाचा अवलंब करणारी वस्तू आणि सेवा करांची प्रणाली त्या दिवसापासून व्यवहारात अवतरली. अप्रत्यक्ष करांच्या तिथवर कार्यवाहीत असलेल्या व्यवस्थेतील एकंदर १७ विविध कर आणि १३ उपकर वस्तू आणि सेवा करामध्ये समाविष्ट करण्यात आले. वस्तू आणि सेवा करामध्ये विलीन करण्यात आलेल्या त्या करांद्वारे तसेच उपकरांद्वारे संकलित होणा-या महसुलाचे केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारांच्या करमहसुलाशी असणारे सरासरी प्रमाण अनुक्रमे ३७ टक्के व ५० टक्के इतके भरते. वस्तू आणि सेवा कराची प्रणाली देशभरात लागू झाल्यानंतर राज्य सरकारांच्या करमहसुलामध्ये प्रारंभीच्या पर्वात अनुभवास आलेले हेलकावे व चढ-उतार आता मावळत असून सर्वसाधारण प्रवास स्थैर्याच्या दिशेने चालू झालेला आहे. राज्य सरकारांच्या तिजोरीत वस्तू आणि सेवा कराच्या माध्यमातून जमा होणा-या महसुलाचा गेल्या दोन ते तीन वर्षांतील कल बघितला तर तो एकंदरीने चढता दिसतो.

देशपातळीवर दिसणारे चित्र असे असले तरी, वस्तू आणि सेवा करांच्या माध्यमातून जमा होणा-या महसुलामध्ये राज्याराज्यांदरम्यान लक्षणीय तफावत आढळून येते. अर्थात, वस्तू आणि सेवा कराची सध्या प्रचलीत असणारी प्रणाली अजूनही उत्क्रांतीच्या पर्वातूनच प्रवास करते आहे, ही बाब या संदर्भात नजरेआड करता येणार नाही. स्थिरावण्यासाठी तिला अधिक काही काळ द्यावा लागेल. वस्तू आणि सेवा करांच्या रचनेचे सुसूत्रीकरण घडवून आणण्याचे काम वस्तू आणि सेवा कर परिषद करत आलेली आहे. परिणामी, वस्तू आणि सेवा कराची प्रणाली लागू होते वेळी या कराचा असणारा १४.४ टक्क इतका भारित सरासरी दर २०१९-२० या वित्तीय वर्षात सरासरी ११.६ टक्क्यांवर आलेला होता. या व्यवस्थेचा आतापर्यंतचा अनुभव बघता, करांचा विस्तारलेला पाया आणि करव्यवस्थेतील त्रुटींचे निराकरण घडवून आणण्याची सक्रिय असलेली प्रक्रिया या दोहोंपायी राज्य सरकारांची करसंकलनासंदर्भातील तरणशक्ती (Tax Buoyancy) अधिक सक्षम बनत असल्याचे/बनलेली असल्याचे चित्र दिसते.

वस्तू आणि सेवा करव्यवस्थेच्या अंमलबजावणीद्वारे महसूल संकलनासंदर्भातील अपेक्षित उद्दिष्टांची परिपूर्ती काही राज्यांच्याबाबतीत होत नसल्याचे आजवरचे चित्र दिसते. या नवीन करप्रणालीची तामिली सुरू झाल्यापासून ज्या राज्य सरकारांच्या करमहसुलामध्ये घट अनुभवास येत राहिली अशा राज्यांना, भरपाईदाखल, त्यासाठीच लागू केल्या गेलेल्या उपकराद्वारे जमा झालेल्या महसुलातून हिशेबानुसार निधी केंद्र सरकारकडून अदा करण्यात आला. वस्तू आणि सेवा करांच्या व्यवस्थेतीची महसूल संकलनासंदर्भातील क्षमता पुरेपूर वापरली जाण्याच्या दृष्टीने या व्यवस्थेतील सध्याच्या त्रुटींचे निराकरण घडवून आणणे, त्यासाठी माहिती-तंत्रज्ञानाधारित प्रणालींचे उपयोजन अधिक प्रभावीपणे केले जाणे, या करप्रणालीतील कच्च्या दुव्यांचे सक्षमीकरण हाती घेणे यांसारख्या उपाययोजनांसंदर्भात सक्रिय बनणे, हे वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या पुढ्यातील मुख्य व प्रबळ आव्हान होय. एकंदर करमहसुलाचे ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी प्रमाण उंचावणे आणि त्याच बरोबर, अर्थव्यवस्थेची सर्वसाधारण स्पर्धाक्षमता अधिक कणखर बनविण्याच्या दृष्टीने या सगळ्या संदर्भात उचित अशी पावले परिणामकारकपणे उचलली जाणे अत्यावश्यक शाबीत होते.

वस्तू आणि सेवा कराच्या प्रचलीत व्यवस्थेचा विचार करता, अल्कोहोल आणि खनिज तेलजन्य अशी पेट्रोल व डिझेलसारखी इंधने आज या व्यवस्थेच्या कक्षेबाहेरच आहेत. पेट्रोल आणि अल्कोहोलवर राज्य सरकारांकडून आकारल्या जाणा-या अनुक्रमे विक्री कर व अबकारी कर या दोन करांद्वारे संकलित होणा-या महसुलाचे बव्हंश राज्यांच्या एकंदर महसुलाशी भरणारे सरासरी प्रमाण अनुक्रमे १५ ते २० टक्के व १० ते १५ टक्के असे आजमितीस भरते. राज्य सरकारे आजघडीस पेट्रोल आणि डिझेल या दोन इंधनांवर आकारत असलेल्या करांचे व्यवहारातील प्रत्यक्ष दर सरासरीने अनुक्रमे २८ टक्के व २० टक्के इतके भरतात. राज्य सरकारांच्या माथ्यावरील कर्जांचे व्यवस्थापन आणि सुसूत्रीकरण कार्यक्षमपणे होण्याच्या दृष्टीने इंधने व अल्कोहोल या दोन जिनसांवरील करांचा अंतर्भाव वस्तू आणि सेवा कराच्या कक्षेमध्ये त्वरेने केला जाणे अतिशय महत्वाचे ठरते. या संदर्भात अधिक विलंब अहितकारक ठरावा. ■■



*(पृष्ठ क्रमांक १८ वरून)*

चिनी नवमध्यमवर्गातील तरुणांनी चीनमधील तिआनमेन चौकात १९८९ सालीच छेडलेल्या लोकआंदोलनामुळे चिनी राज्यकर्ते एकदम कमालीचे सावध बनले. लोकशाहीपूरक मानसिकतेची बीजे नवतरूण चिनी पिढीमध्ये रुजत असल्याची ती आद्य चिन्हे होती. उदारमतवादी, बाजारपेठीय खुल्या व्यापारव्यवस्थेची मूलतत्वे आर्थिक विकासासाठी अनुकूल भूमी उपलब्ध करून देतात, हे प्रमेय लोकशाहीप्रधान पश्चिमी राष्ट्रांमधील अर्थविकासाच्या पूर्वानुभवाने जगभरात सर्वत्रच ब-यापैकी प्रस्थापित बनवले होते. चीनला नेमके वावडे होते व आहे ते लोकशाही विचारसरणीचेच. त्यांतूनच, भरधाव आणि भरघोस आर्थिक वाढविकासाच्या प्रक्रियेला कोणत्याही प्रकारचा अडथळा उत्पन्न तर होऊ द्यावयाचा नाही आणि त्याच वेळी कम्युनिस्ट पक्षाच्या एकाधिकारशाहीची समाजव्यवस्थेवरील पोलादी पकडही शाबूत राखायची, असे चीनच्या पुढ्यातील आव्हानाचे स्वरूप गेली सुमारे चार दशके गुंतागुंतीचे बनलेले आहे.

हा पेच इथेच संपत नाही. १९७०च्या उत्तरार्धापासून चीनने राबविलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाद्वारे लोकशाही रचनाप्रवण अशा पश्चिमी राष्ट्रांबरोबर प्रस्थापित झालेले चीनचे व्यापारी संबंध गेल्या सुमारे चार दशकांदरम्यान चांगल्यापैकी घनिष्ठ बनलेले आहेत. लोकशाहीवादी शक्तींना देशांतर्गत पायबंद घालायचा आणि त्याच वेळी, लोकशाहीप्रवण देशांबरोबर बहरलेल्या आर्थिक संबंधांना कोणतीही बाधा उत्पन्न होऊ द्यायची नाही, असा मोठा जटिल दुपेडी पेच आजच्या चीनच्या पुढ्यात दत्त म्हणून उभा ठाकलेला आहे.

उर्वरित जगालाही असाच एक दुपेडी पेच सतावतो आहे. चीनच्या वाढत्या वर्चस्वाला आणि त्याची प्रगट खूण असलेल्या उद्दाम आक्रमकपणाला परिणामकारक असा पायबंद कसा घालावा, हे पश्चिमी राष्ट्रांना आज उमगेनासे झालेले दिसते. वरकड जगाची चिनी अर्थव्यवस्थेशी आजवर बसत आलेली घट्ट सांगड या प्रश्नाच्या मुळाशी आहे. आर्थिक बहिष्काराचे अस्त्र चीनवर उपसावे तर ते 'बूमरँग' होण्याचीच धास्ती विकसित राष्ट्रांना सर्वांत मोठी आहे. उर्वरित जगासमोरील समस्येचे दुपेडीपण हे असे आहे.

या संदर्भात अलीकडील काळात सातत्याने पुढ्यात उभरत असलेले चित्र मोठे मननीय ठरते. आपल्या आर्थिक आणि वित्तीय हिताला नख लावण्याची एकाही विकसित देशाची आजघडीला तयारी नाही, हाच त्या चित्राचा सारांश. राजकीयदृष्टया तसेच राजनैतिक स्तरावर चीनच्या ज्या अनिष्ट कारवाया चालू आहेत त्यांच्याबाबत बोटचेपे धोरण स्वीकारण्याचा पर्याय आज जवळपास सगळेच स्वीकारताना दिसतात. राजकारण आणि अर्थकारण यांची ज्या सांगड गेली सुमारे चार दशके वैश्विक स्तरावर ज्या पद्धतीने बसत आलेली आहे, तिचा हा स्वाभाविक परिपाक म्हणावा लागेल. काहीही झाले तरी चिनी अर्थव्यवस्थेबरोबर आपापल्या देशाचे उत्क्रांत झालेले आर्थिक संबंध टिकवून धरण्याला आज प्राधान्य सगळेच देत आहेत. 'वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र' म्हणून गेल्या तीन दशकांमध्ये चीनने ज्या राक्षसी क्षमता विकसित केल्या त्याची गोमटी आणि कडवट फळे आज अनुक्रमे चीन आणि उर्वरित जग चाखते आहे.

चीनबरोबरचे व्यापारी संबंध बिघडविणे आज कोणत्याही देशाला परवडणारे नाही. कोविड-१९ या विषाणूचा उगम, हाँगकाँगमधील लोकशाहीवर फिरवलेला वरवंटा, शिनशियांग प्रांतात जारी राखलेली मूलभूत मानवी हक्कांची पायमल्ली, आपल्या शेजारी देशांवर धाकदपटशाही करण्याचे धोरण...यांसारख्या चीनच्या अलीकडील काळातील कागाळ्या कानाडोळ्यांआड करण्याचा सोयीस्कर पवित्रा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्वीकारावा, हा त्या वास्तवाचा सज्जड पुरावा ठरतो. 'गोल्डमन सॅक्स', 'मॉर्गन स्टॅन्ले', 'सीमेन्स', 'ॲपल', 'स्टारबक्स' यांसारख्या जागतिक स्तरावरील संघटित कॉर्पोरेट बलदंडांनी चिनी अर्थव्यवस्थेकडे आजही वाहता राखलेला गुंतवणुकीचा ओघ त्याच वस्तुस्थितीकडे बोट करतो. उर्वरित जगाच्या पुढ्यात उभ्या ठाकलेल्या दुपेडी गुंत्याचे भेदक दर्शनच या सा-यातून घडते.

जगाच्या याच अगतिकतेचा लाभ कमालीच्या कुटिल धोरणीपणाने आजचा चीन उठवतो आहे. या धोरणामागे ठामपणे उभी आहे ती चीनने हजारो वर्षे जपलेली एक वैशिष्ट्यपूर्ण अशी इतिहासदृष्टी आणि मानसिकता. ती मानसिकता एकदा का उकलली की अनेक बाबी स्पष्ट होतात.



जागतिक स्तरावरील अव्वल मुत्सद्दी राजनीतीज्ञांमधील एक अग्रणी म्हणून ज्यांचा आवर्जून निर्देश केला जातो ते अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांनी चीनबद्दल लिहिलेल्या अभ्यासपूर्ण ग्रंथात चिनी मानसिकतेच्या पूर्वापार जडणघडणीचे विलक्षण प्रगल्भ कथन सादर केलेले आढळते. किसिंजर यांच्या कथनानुसार, चीनच्या पूर्वेतिहासाचा धांडोळा घेऊ गेले तर, चिनी सत्ता म्हणजे काही तरी अतींद्रिय, निसर्गदत्त, ईश्वरी संकेत असावा अशा त-हेच्या गूढरम्य धारणा व त्यांवर आधारित असणारी चीनकडे बघण्याची दृष्टी काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर चिनी नागरिकांच्या मानसिकतेवर पगडा गाजविताना दिसते. चिनी सम्राटांच्या आदि-अंताचे तपशील हाताशी येतात परंतु चिनी साम्राज्य जणू काही अनादीच आहे, अशाच प्रकारचा पूर्वेतिहासातील नोंदींचा सूर दिसतो. त्यांमुळे, चिनी साम्राज्याची चिकित्सा रूढ अशा 'राष्ट्र-राज्य' संकल्पनांच्या रूढ व पठडीबद्ध चौकटीमध्ये आपल्याला करता येत नाही, असे किसिंजर यांचे विश्लेषण आहे. राज्यशास्त्रातील या पारंपरिक आकृतिबंधापेक्षाही निसर्गदत्त चिरस्थायी चमत्कार म्हणूनच चिनी साम्राज्याचे अस्तित्व पूर्वापार पुढ्यात अवतरते अशी टिप्पण्णी ते करतात.

एक निसर्गदत्त अधिष्ठान या रूपातच अनादी काळापासून विद्यमान असलेले चिनी साम्राज्य काळाच्या ओघात -हास-विकासाच्या हिंदोळ्यांवर हेलकावे खात आलेले आहे, असा इतिहासाचा दाखला दिसतो. जो कोणी चीनच्या आद्य सम्राट गणला जातो त्याच्याबद्दल अपरंपार आदर चिनी मानस व्यक्त करते हे खरे आहे. परंतु, आद्य गणला जाणारा ज्ञात इतिहासातील तो सम्राटही चीनचा 'निर्माता' अथवा 'संस्थापक' कधीच गणला जात नाही. तो असतो -हासपर्वात अधोगतीस गेलेल्या चिनी साम्राज्याचा 'पुनर्स्थापक'. चिनी साम्राज्य हे अनादी गणले जात असल्याने त्याची 'निर्मिती' या विचारव्यूहात अप्रस्तुतच ठरते. काळाच्या अथांग प्रवाहात या साम्राज्याचे वेळोवेळी होत राहते 'पुनर्स्थापन'. हाच न्याय लावला जातो चिनी संस्कृतीलादेखील. साहजिकच, कन्फ्युशिअस हे चिनी संस्कृतीचे प्रवर्तक अथवा संस्थापक ठरत नाहीत तर ते केवळ ठरतात चिनी संस्कृतीला नवाई, नूतन रंगरूप बहाल करणारे सर्जक.

असे हे अनादी गणले जाणारे चिनी साम्राज्य हाच या विश्वाचा निसर्गदत्त गुरु त्वमध्य होय, ही धारणा चिनी मानसिकतेमध्ये पूर्वापार दृढमूल बनलेली आहे आणि वेगवेगळ्या काळातील धुरिणांनी ती तशी प्रयत्नपूर्वक स्थिरही केलेली आहे. त्यांमुळे, उभ्या जगाची व्यवस्था चीनकेंद्री असणे हाच सर्वसामान्य चिनी नागरिकाच्या मते स्वाभाविक नियम होय. राजकीय अस्थिरता अथवा प्रतिकूल अशा काही भौगोलिक घडामोडींपायी वैश्विक व्यवस्थेच्या त्या निसर्गसिद्ध केंद्रस्थानावरून, समजा, चीन प्रसंगवशात ढळलाच तर त्याला पुन्हा केंद्रवर्ती स्थान प्रगट करून देणे हे त्या त्या काळातील चिनी समाजाचे इतिकर्तव्य ठरते. पूर्वापार रुजत आलेल्या नेमक्या त्याच धारणेला जिनपिंग जाणीवपूर्वक खतपाणी आज घालत आहेत. आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या सामर्थ्यसंपन्न बनलेल्या आजच्या चीनला प्रथम आशिया खंडाची आणि यथावकाश जगाची केंद्रसत्ता बनविण्याचे ध्येय जिनपिंग यांनी आजच्या चिनी पिढ्यांच्या मानसिकतेमध्ये पक्के केले आहे. आज दृश्यमान होत असलेली चीनची हडेलहप्पी आक्रमकता म्हणजे त्याच मानसिकतेचा जोरकस प्रगट हुंकार होय. ■■

**संदर्भ :**

(1) Pradhan, R. D. : Dragon's Shadow Over Arunachal : A Challenge to India's Polity, Rupa & Co., New Delhi, 2008.

(2) China's influence on Conflict Dynamics in South Asia : United States Institute of Peace, 16 December 2020. USIP China-South Asia Senior Study Group : usip.org/publications/2020/12/china-influence-conflict-dynamics-south-asia. (3) The Economist : March 20th-26th 2021.(4) Kissinger, Henry, On China, Allen Lane an inprint of Penguin Books, UK, 2011. (5) Hasa, Ryan et.al, The trajectory of Chinese foreign policy : From retractive assertiveness to opportunistic activism : http://www. theasanforum.org/the-trajectory-of-chinese-foreign-policy-from-reative-assertiveness-to-opportunistic-activism. (6) https://www.sciencefocus.com/the-human-body/why-social-media-makes-us-so-angry-and-what-you-can-do-about-it/. ■■



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : Vidya Sahakari Bank, S. B. Road, Pune - 411016
- Account Name : Indian School of Political Economy
- Bank Account No. - 200403130004208
- NEFT/RTGS No - SVCB0003004
- IFSC Code : SVCB0003004

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

## विचारशलाका

**रा. ना. चव्हाण यांचे प्रबोधनात्मक निवडक निबंध,**
**संपादक - रमेश चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, अक्षर श्रद्धांजली, पुष्प : ४०, प्रथमावृत्ती : १० एप्रिल २०२०,**
**रा. ना. चव्हाण सत्ताविसावा स्मृतिदिन,**
**पृष्ठे १९२, मूल्य - २५०/- रुपये.**

परिवर्तनवादी विचारांची आणि अशा विचारांच्या उपयोजनाद्वारे परिवर्तनाच्या चळवळीला वैचारिक खाद्य पुरविण्याची प्रदीर्घ परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. महात्मा जोतीराव फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू छत्रपती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही सारी या परंपरेतील लखलखीत नावे. या लोकोत्तर व्यक्तिमत्वांच्या विचारविश्वाचा विचक्षण धांडोळा घेणारे अपार लेखन आजवर प्रकाशित झालेले आहे. आजही त्यांत खंड नाही. परंतु, त्या सगळ्या विचारसंपदेचे प्रयोजन व उपयोजन आज नेमके कसे, कोठे, किती व का प्रस्तुत ठरते याचा तटस्थपणे आणि अ-विकारी वृत्तीने धांडोळा घेणारे लेखन त्या मानाने अल्पस्वल्पच उपलब्ध होते. प्रार्थना समाजाचे मूल्यपाथेय डोळसपणे जगलेले व जपलेले गेल्या पिढीतील सजग आणि विवेकी समाजाभ्यासक रा. ना. चव्हाण यांच्या एकंदर १७ लेखांचे संकलन असणारा प्रस्तुत दस्तऐवज म्हणूनच महत्वाचा संदर्भस्त्रोत शाबीत होतो. १९५० ते १९८० अशा तीन दशकांदरम्यान विविध दैनिके तसेच नियतकालिके यांच्या व्यासपीठाद्वारे प्रकाशित झालेले रा. ना. चव्हाण यांचे साहित्य, संस्कृती, धर्म, समाजजीवन, सामाजिक विकास, प्रजासत्ताक...अशा विविध प्रांतांना स्पर्श करणारे चिंतनजन्य व विचारप्रवर्तक लेखन समाविष्ट असणारे हे पुस्तक, विशेषतः, समकालीन तरूण पिढीला निश्चितच अभ्यसनीय वाटेल. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**